**संक्षिप्त फौजदारी केस नं. २००/२०२०**
**नि. क्र. १९ लगत**

**<u>निशाणी क्रमांक ४२ कडील आदेशान्वये अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ – योगेश दत्ताराम शिंदे यांचा उलटतपास शपथेवर, आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडुन</u> –**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, माझे गाव सोनवडे हे देवरुख पासुन ०७ ते ०८ किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा तयार करुन ठेवला होता व केवळ माझी त्यावर सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझी कोऱ्या कागदावर सही घेतली होती व त्या कोऱ्या कागदावर नंतर नकाशा रेखाटला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ त्या तयार पंचनाम्यावर त्यावेळी सही केली होती.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक २५ कडील नकाशावर मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे चतुःर्सिमा नमुद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात बसुन दोन्ही सहया केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा सुरु झाल्याची व संपल्याची नेमकी वेळ मला सांगता येणार नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, अंदाजे सकाळी ११:०० ते दुपारी ०२:०० च्या दरम्यान पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सकाळी ११:०० ते दुपारी ०२:०० च्या दरम्यान पंचनामा केल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अनेक गुन्हयामध्ये पंच म्हणुन काम पाहिले आहे.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक २४ कडील पंचनामा व निशाणी क्र. २५ कडील नकाशा हे दोन्ही खोटे व खोडसाळ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेटांबे यांच्याकडुन मी माझा प्लॅट विकत घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेटांबे मालक असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी त्यांच्या बाजुने खोटे कथन केले आहे. हे

म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष घटनास्थळी गेलेलोच नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.24 18:21:11 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक २४.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 24/04/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 24/04/2026 |
| Evidence uploaded on | :- | 24/04/2026 |